**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : ०५ जून, २०२४**

**ठळक बातम्या**

- **सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग, एनड़ीए आणि इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठका आज दिल्लीत**
- **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पंतप्रधान पदासह केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा सुपूर्द, १७ वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस.**
- **राज्यातील भाजपच्या पराभवाची जबाबदारी घेत उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याबाबत देवेंद्र फडणवीस यांचं केंद्रीय नेतृत्वाकडे निवेदन.**
- **आज जागतिक पर्यावरण दिन सर्वत्र वृक्षारोपणासह विविध कार्यक्रमांनी साजरा.**

**एनडीए तसंच इंडिया आघाडी बैठक**

लोकसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएला २९२ जागांसह स्पष्ट बहुमत मिळालं आहे. भाजपला २४०, तेलुगू देसम पक्षाला १६, तर संयुक्त जनता दलाला १२ जागा मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीला २३३ जागांवर विजय मिळाला आहे. यात काँग्रेसच्या ९९, समाजवादी पक्षाच्या ३७, तर तृणमूल काँग्रेसच्या २९ आणि द्रमुकच्या २२ जागांचा समावेश आहे. इतर पक्षांना १८ जागा मिळाल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनं रणनीती ठरवण्यासाठी एनडीएची बैठक आज नवी दिल्ली इथं होणार आहे. लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार या बैठकीत सहभागी होणार आहेत.

इंडिया आघाडीची बैठकही आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार आहे. निवडणुकीचे निकाल आणि नंतरची रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**लोकसभा विसर्जित - शिफारस**

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव म्हटल्या जाणाऱ्या लोकसभा निवडणूक २०२४ चा निकाल काल लागला. त्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे

पंतप्रधान पदासह केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. यातून १७ वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस त्यांनी राष्ट्रपतींकडे केली. दरम्यान, नवीन सरकार स्थापनेवर चर्चा करण्यासाठी ७ जून रोजी राष्ट्रीय लोकशाही आघाडीची  दिल्लीत बैठक होणार आहे. तूर्तास नव्या सरकारचा शपथविधी ८ जून रोजी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राष्ट्रपतींनी राजीनामा स्वीकारत पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रीमंडळाला नवीन सरकार स्थापन होईपर्यंत पदावर राहण्याची विनंती केली आहे. सध्याच्या १७ व्या लोकसभेचा कार्यकाळ १६ जून रोजी संपत आहे. लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो, परंतु पंतप्रधान किंवा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच राष्ट्रपती लोकसभा विसर्जित करू शकतात. आता मंत्रिमंडळाने लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस केली असून, राष्ट्रपतींच्या मान्यतेने १७ वी लोकसभा विसर्जित होईल.

**विजय वडेट्टीवार**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला ऐतिहासिक विजय मिळाला, हे आमच्या एकीचं  बळ होतं. विविध पक्ष फोडून त्यांना  खिळखिळं  करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला.  सत्तेच्या  लालसेपोटी  कोणत्याही स्तराला जाणाऱ्या प्रवृत्तीला जनतेनं मतदानातून उत्तर दिल्याचं विधानसभेतील  विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकालांतील महाविकास आघाडीचं यश हे राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचं यश असल्याचंही वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस / बावनकुळे**

महाराष्ट्रातल्या लोकसभेच्या सर्व ४८ जागांचे निकाल काल जाहीर झाले असून महाविकास आघाडीला ३०, तर  महायुतीला १७ जागा मिळाल्या आहेत. राज्यात काँग्रेसनं सर्वात जास्त १३ जागांवर विजय मिळवला असून भाजपनं ९ जागा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ९, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं ८, शिवसेनेनं ७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला आहे, तर एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

राज्यातील भाजपच्या पराभवाची जबाबदारी घेत उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवली आहे. यासाठी केंद्रीय नेतृत्वाकडे पदाचा राजीनामा देण्याची परवानगी आपण मागितली असून

नेतृत्वानं परवानगी दिली, तर पूर्णवेळ विधानसभा निवडणुकीचा प्रचार करता येईल, असं फडणवीस यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं.

दरम्यान, पराभव ही सामूहिक जबाबदारी असते. फडणवीस यांनी राजीनामा न देता संघटनेसाठी काम करावं, अशी विनंती केंद्रीय नेतृत्वाला आपण करणार असल्याचं भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं.

तत्पूर्वी लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अशोक चव्हाण, मंत्री गिरीश महाजन, आशिष शेलार आदी नेते यावेळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री शिंदे प्रतिक्रिया**

दरम्यान, निवडणुकीतील पराभव ही सामूहिक जबाबदारी आहे. आम्ही तिन्ही पक्षांनी निवडणुकीत एकत्र काम केलं होतं, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मतांची टक्केवारी पाहिली तर मुंबईत महायुतीची मतांची भागीदारी वाढली आहे. पराभवाची कारणमीमांसा केली जाईल. गेल्या दोन वर्षात राज्यात अनेक चांगले निर्णय सरकारनं घेतले. या निवडणुकीत जागा कमी झाल्या असल्या तरी मतं वाढली आहेत. फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या असतील; तरी आपण त्यांच्यासोबत चर्चा करू आणि आम्ही विकासाचा अजेंडा घेऊन पुढे जाऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**नाना पटोले -प्रतिक्रिया**

जनतेनी भाजपला नाकारलं आहे. फडणवीस यांनी राजीनामा द्यावा किंवा नाही, हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. पण जनतेनी भाजपला त्यांची जागा दाखवली आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी फडणवीसांच्या राजीनामा प्रस्तावावर बोलताना दिली.

**प्रफुल्ल पटेल**

राज्यसभेचे सदस्य प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागी महाराष्ट्र विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांकडून एका सदस्याची निवडणूक घेण्यासाठीची सूचना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयानं जारी केली आहे. त्यानुसार उमेदवार अथवा त्याच्या

सूचकाला १३ जूनपर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार असून, निवडणूक लढवली गेल्यास २५ जून रोजी मतदान होणार आहे.

**रमेश कीर + भाजप उमेदवार**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसनं रमेश कीर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत ही माहिती दिली.

दरम्यान विधान परिषदेच्या मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी भाजपनं शिक्षक परिषदेचे उमेदवार शिवनाथ दराडे यांना पाठिंबा दिल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत केली.

**टी - ट्वेंटी**

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना आयर्लंड विरुद्ध होणार आहे. न्यूयॉर्क इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

**पर्यावरण दिन**

जागतिक पर्यावरण दिवस आज साजरा होत आहे. पर्यावरणविषयक तातडीच्या समस्यांवर जनजागृती आणि कृती करण्याच्या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेच्या मानव पर्यावरणावरील स्टॉकहोम परिषदेदरम्यान या दिवसाचा आरंभ करण्यात आला होता. यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना, 'जमिनीचं पुन:स्थापन, वाळवंटीकरण आणि दुष्काळावर मात', अशी आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरिकांना शाश्वततेवर आधारित एक चांगलं आणि हरित जग निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचं आवाहन केलं आहे. पृथ्वीचं रक्षण करणं ही आपली मुख्य जबाबदारी असल्याचं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं आहे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देताना मानवता आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद हा शाश्वत जीवनाचा पाया असल्याचं सांगितलं.

यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीत 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत बुद्ध जयंती उद्यानात वृक्षारोपण केलं. देशभरात करोडो झाडं लावण्यासाठी

एक प्रकारे जनआंदोलन उभारण्याच्या उद्देशानं ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यावेळी उपस्थित होते.

आज भारतीय जल संसाधन संस्था नागपूर आणि ज्ञानदीप नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण दिनानिमित्त झाडे लावून जगविण्याचा संकल्प करणाऱ्या नागरिकांना शिसम , करंजी, कडुनिंब, जारूड, कदंब अशी सुमारे एक हजार मौल्यवान झाडे विनामूल्य वितरित करण्यात आली.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, केंद्रीय संचार ब्युरोच्या नागपूर क्षेत्रीय कार्यालयाद्वारे वजह फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने, सिद्धेश्वरी गोंड वस्ती मानेवाडा इथं आरोग्य शिबिर, औषध वाटप, प्रश्नमंजुषा आदी उपक्रम घेण्यात आले.

त्याचप्रमाणे आज नागपूरच्या राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्था अर्थात निरी मध्ये आजसंध्याकाळी कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. गोंडवाना विद्यापीठाचे कुलपती डॉ. प्रशांत बोकारे या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत.

नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रातर्फे आज जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. वनराई फाऊंडेशनचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी आणि प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते या परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे देखील आज वृक्षारोपण करण्यात आलं. सरकार नगर इथल्या मनपाच्या आदर्श उद्यानात महानगरपालिका उपायुक्त रवींद्र भेलावे आणि उपस्थित नागरिकांच्या हस्ते विविध प्रजातींच्या रोपट्यांची लागवड करण्यात आली; त्याचप्रमाणे अमरावती शहराचा ऑक्सिजन पार्क असलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरात जागतिक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आलं.

**राष्ट्रीय लोक अदालत**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय - नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण- उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशान्वये नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीनं येत्या 27 जुलै रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस मध्य अरबी समुद्राचा आणखी काही भाग, तसंच गोव्यात पुढे सरकला आहे. येत्या तीन ते चार दिवसांत राज्यात मोसमी पाऊस दाखल होण्यासाठी स्थिती अनुकूल असण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आगामी काही तासात विदर्भातील गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा येऊन हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काल अकोला आणि अमरावती इथं सर्वत्र तुरळक पाऊस झाला. चिखलदरा इथं ४३. ६ दशांश मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद करण्यात आली.

सध्या विदर्भातील सर्व जिल्ह्यांत तापमानात घट दिसून येत आहे. मागील २४ तासांत सर्वाधिक तापमान भंडारा इथं ४१. २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं, तर नागपूर इथं ३९.२ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

#####